


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३४० वा | शुक्रवार दि १० एप्रिल २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार हर्षवर्धन सपकाळांची अधिकृत माहिती, सुनेत्रा पवारांसाठी मार्ग मोकळा

**वृत्तसंस्था/बारामती**

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीतून काँग्रेसने आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसने ही मोठी घोषणा केली असून, यामुळे आता ही निवडणूक बिनविरोध होण्याच्या मार्गातील मोठा अडथळा दूर झाला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या निर्णयाची अधिकृत घोषणा केली आहे. प्रदेशाध्यक्षांनी राज्यातील प्रमुख नेत्यांच्या भावना केंद्रीय नेतृत्वापर्यंत पोहोचवल्यानंतर, हायकमांडने माघार घेण्यास हिरवा कंदिल दाखवला. त्यानंतर पत्रकार परिषदेतून हा निर्णय त्यांनी जाहीर केला आहे. ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महायुतीचे नेते गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्नशील होते. काँग्रेसने या निवडणुकीसाठी आकाश मोरे यांना उमेदवारी दिली होती. मात्र, या निर्णयानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांचा विजयाचा मार्ग अधिकच सुकर झाल्याचे मानले जात आहे.



पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ यांनी अजित पवार गटाच्या भाजपसोबतच्या युतीवर जोरदार टीका केली. राष्ट्रवादीचा अजित पवार गट भाजपसारख्या विखारी पक्षासोबत राहू नये. सत्तेसाठी लाचार होऊ नये,फ्फ असे ते म्हणाले. अजित पवार यांच्यासारख्या मोठ्या नेत्याने अशी भूमिका घेणे दुर्दैवी असल्याचेही त्यांनी नमूद केले दरम्यान, काँग्रेसने माघार घ्यावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून सातत्याने संपर्क साधला जात होता, अशी माहितीही सपकाळ यांनी दिली. रोहित पवार यांनी आज सकाळीच त्यांची भेट घेऊन विनंती केली होती. तसेच शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनीही काँग्रेसने उमेदवारी मागे घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. भाजपच्या विरोधात वैचारिक भूमिका म्हणून आम्ही ही निवडणूक लढवत होतो. मात्र अजित पवार यांच्यासोबत काम केल्यामुळे आणि भावनिक भूमिका लक्षात घेता राष्ट्रवादीकडून मघार घेण्याची विनंती करण्यात आली,फ्फ असे सपकाळ यांनी स्पष्ट केले. काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी प्रचारालाही सुरुवात केली होती, असेही त्यांनी सांगितले. सपकाळ यांनी पुढे सांगितले की, सुनेत्रा पवार यांनीही फोनवरून संपर्क साधत काँग्रेसने माघार घ्यावी, अशी विनंती केली होती. महायुतीतील विविध नेत्यांनीही काँग्रेसच्या नेत्यांशी चर्चा केली होती. याशिवाय मल्लिकार्जुन खरगे यांच्याशीही दिल्लीत सुनेत्रा पवार यांनी भेट घेतल्याची माहिती त्यांनी दिली.

# उद्धव ठाकरेंचे खासदार शिवसेनेत येण्याच्या चर्चा दीड वर्षांपासून सुरू, पण त्यात तथ्य नाही!


**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा भूकंप होण्याची शक्यता वर्तवली जात असून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ८ खासदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असल्याचे बोलले जात आहे. विविध माध्यमांनी याबाबतचे वृत्त दिल्यानंतर दोन्ही शिवसेनेच्या गोटात खळबळ उडाली होती. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली भूमिका मांडत या सर्व चर्चा फेटाळून लावल्या असून माझी उद्धव ठाकरेंच्या पक्षातील कोणत्याही खासदारासोबत बैठक झाली नसल्याचा दावा केला आहे. शिवसेनेच्या ऑपरेशन टायगरबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागल्यानंतर आणि काही प्रसारमाध्यमांनी ठाण्यात याबाबत बैठक झाली असल्याचा दावा केल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. उबाठाच्या खासदारांसोबत झालेल्या कथित बैठकीचे वृत्त पूर्णपणे निराधार, खोडसाळ आणि गैरसमज निर्माण करणारे आहे. अशी कोणतीही बैठक झालेली नाही, असं शिंदे यांनी सांगितलं आहे. दरम्यान, ङ्कङ्कउबाठाचे खासदार फुटून शिवसेनेत येणार असल्याच्या बातम्या गेल्या एक-दीड वर्षांपासून पसरवल्या जात आहेत. परंतु, या बातम्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य नाही. ती केवळ अफवा असून सनसनाटी निर्माण करण्यासाठी अशा पद्धतीच्या बातम्या देणे माध्यमांनी टाळले पाहिजे, असं आवाहनही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केलं आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत दुसऱ्यांदा मोठी फूट पडणार असल्याचा दावा काही माध्यमांकडून करण्यात आला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचे अनिल देसाई वगळता इतर ८ खासदारांची बुधवारी रात्री ठाण्यात एकनाथ शिंदे यांच्यासोबत बैठक झाल्याचं सांगण्यात आलं आहे. या बैठकीला ८ पैकी ६ खासदार प्रत्यक्ष तर दोन खासदार व्हिडिओ कॉलवरून उपस्थित होते, असाही दावा करण्यात आला. विशेष म्हणजे उपस्थित असलेल्या ६ खासदारांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करण्यासाठी तयार असल्याचं सांगत एका



पत्रावर सही केल्याचंही सदर वृत्तांमध्ये नमूद करण्यात आलं होतं. दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी जरी ठाकरेंच्या खासदारांबाबतच्या चर्चा फेटाळून लावल्या असल्या तरी याबाबत आगामी काळात काय राजकीय घडामोडी घडतात, हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

# सत्पात्र आणि अपात्र...



राज्यातील सुमारे साडेसातशे शाळा व कनिष्ठ महाविद्यालये सरकारी अनुदानास अपात्र ठरवण्याचा निर्णय, हा राज्य सरकारचे आजवरचे धरसोडीचे धोरण, संस्थाचालक व सरकार यांच्यामधील साटेलोटे आणि खासगी शाळांकडे वाढता कल अशा वेगवेगळ्या दुखण्यांचा परिपाक आहे. सरकारने वारंवार संधी देऊनही आवश्यक निकषांच्या पूर्ततीत अपयशी ठरलेल्या राज्यातील सव्वातीनशे माध्यमिक शाळा आणि चारशेहून अधिक कनिष्ठ महाविद्यालयांना वेतन अनुदानासाठी कायमस्वरूपी अपात्र ठरवण्यात आले आहे. या संस्था अडचणीत आल्याने हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्यही धोक्यात आले आहे. आता या संस्थांमधील विद्यार्थ्यांना जवळच्या शाळांमध्ये सामावून घ्यावे आणि संस्थांनी स्वयंअर्थसहायित तत्त्वावर नव्याने मान्यता घ्यावी, असे पर्याय सरकारने ठेवले असले, तरी त्यापैकी किती शाळांची तेवढी क्षमता आहे, हा प्रश्न आहे. सध्याच्या पेचातून योग्य मार्ग काढतानाच यापुढे तरी शाळांच्या मान्यतेबाबत स्पष्ट धोरणाची गरज या निमित्ताने अधोरेखित शिक्षण सर्वदूर पोहोचविण्यासाठी राज्यात सर्वत्र जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिकांच्या शाळा आहेतच; या सरकारी शाळांच्या जोडीनेच खासगी संस्थांच्या शाळाही आहेत. वाढती विद्यार्थिसंख्या पाहता शाळांची गरज वाढत गेली, तशा खासगी शाळाही वाढत गेल्या. सुरुवातीला खासगी संस्थांना सरसकट अनुदान देण्याचे धोरण होते. कालांतराने वेतनेतर अनुदानावर मर्यादा आणल्या गेल्या आणि पुढे तर अनुदानासाठी पात्रतेच्या अटीही वाढत गेल्या. शाळा सुरू करणाऱ्या बहुतांश संस्थांना शिक्षणाबद्दल आस्था असली, तरी काही संस्था या संस्थाचालकांच्या राजकीय आकांक्षांच्या पूर्ततेसाठीही आहेत. निव्वळ अनुदानासाठी संस्था सुरू करण्याचेही प्रकार झाले. आज शिक्षण विभागाच्या तरतुदींमध्ये सर्वाधिक वाटा या अनुदानापोटीच खर्च होतो आणि वेतनवाढीमुळे तो खर्चही वाढत जातो. अनुदानाचे ओझे जड झाल्याने विना अनुदानित, पुढे कायमस्वरूपी विना अनुदानित अशी वेगवेगळी धोरणे सरकारने राबवून पाहिली. त्यापैकीच एक म्हणजे प्रारंभी विना अनुदानित संस्था काढणे आणि नंतर या ना त्या मार्गाने सरकारकडून टप्प्याटप्प्याने अनुदान मिळवणे अशी पद्धत सुरू झाली. यामध्ये राजकीय नेत्यांनी काढलेल्या संस्थांचाही समावेश आहे. अशा संस्थांना अनुदानासाठी काही सरकारी निकष आहेत. त्यामध्ये निर्धारित शैक्षणिक पात्रता असलेल्या प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती, कर्मचारी भरतीच्या आराखड्याचे पालन करणे आदींचा समावेश आहे. त्यांचे पालन होते की नाही, याची तपासणी करण्यात आली. त्यातील काही संस्था वारंवार पाठपुरावा केल्यानंतरही निकषांच्या पूर्ततेत अपयशी ठरल्या. त्या पार्श्वभूमीवर सरकारने ७३६ संस्थांना कायमस्वरूपी अपात्र ठरविले. शाळांच्या अनुदान धोरणातील अस्पष्टता, त्यातील सातत्याचा अभाव, शाळांना मान्यता आणि अनुदान देणाऱ्या यंत्रणांमधील राजकीय दबाव-हितसंबंध आणि बदलत्या काळात पालकांचा खासगी शाळांकडे वाढता कल अशा बाबींच्या दुष्टचक्रात सध्या शिक्षण अडकले आहे. एकीकडे सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत असून, आपल्या पाल्यांना खासगी आणि शक्यतो इंग्रजी-सेमी इंग्रजी शाळांमध्ये घालण्याचा कल पालकांमध्ये वाढतो आहे. तेथेही शिक्षण हक्क कायद्यानुसार २५ टक्के विद्यार्थ्यांचा समावेश करून त्यांचा शैक्षणिक खर्च सरकारी अनुदानातून करण्यात येतो. मात्र सरकारी तिजोरीत खडखडाट असल्याने त्यापोटीचे सुमारे सव्वातीन हजार कोटींचे अनुदानही थकलेले आहे. अशा काळात शाळांना परवानगी मागताना आपण ङ्गआत्मनिर्भरफ आहोत, असे चित्र निर्माण केले जाते आणि कालांतराने सरकारी अनुदानासाठी लकडा लावण्यात येतो. मग राजकीय हितसंबंध आणि अन्य गैरप्रकार घडतात आणि अनियमितता असतानाही अनुदानाबाबत निर्णय घेतले जातात. अशा अनेक शाळांमध्ये ङ्गभविष्यात अनुदान सुरू होईल,फ या आशेवर शिक्षकांना विनावेतन किंवा तुटपुंज्या वेतनावर राबवून घेतले जाते. गेली काही दशके शिक्षणमंत्री बदलले की सरकारची धोरणेही १८० अंशांच्या कोनात बदलली जातात आणि अनेकांना त्याचे फटके बसतात, असा महाराष्ट्रातला अनुभव आहे. आता या निर्णयामुळे निर्माण झालेला गोंधळ सरकारला निस्तरावा लागेलच; मात्र यापुढील काळात नव्या शाळांना मान्यता देण्याच्या वेळीच याबाबत सरकारला स्पष्ट भूमिका घेऊन त्याचे काटेकोर पालन करण्याशिवाय अन्य पर्याय नाही.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com


## अमेरिका-इराण शस्त्रसंधीतील अडथळा दूर..

# इस्रायलचे एक पाऊल मागे; लेबनॉनशी चर्चेची तयारी

■ रॉयटर्स, दुबई / बैरुत

अमेरिका आणि इराणमध्ये जाहीर झालेला युद्धविराम इस्रायलच्या लेबनॉनमधील हल्ल्यांमुळे पुन्हा धोक्यात आला होता. मात्र इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी लेबनॉनशी शक्य तितक्या लवकर थेट चर्चेला परवानगी दिल्याचे जाहीर केले आहे. यामुळे अमेरिका-इराण यांच्यात शुक्रवारी पाकिस्तानमध्ये होणाऱ्या शस्त्रसंधीतील अडथळा दूर झाला आहे.

अमेरिका आणि इराणमध्ये झालेल्या युद्धविरामामध्ये लेबनॉनचा समावेश नव्हता, असे इस्रायल आणि अमेरिकेचे म्हणणे होते. तर इराण आणि मध्यस्थ पाकिस्तानने लेबनॉन या कराराचाच भाग असल्याचे म्हटले आहे. ब्रिटन, फ्रान्ससह अनेक देशांनी लेबनॉनचा समावेश युद्धविरामामध्ये करण्यात यावा, असे म्हटले आहे. या दबावानंतर इस्रायलने एक पाऊल मागे घेतले. लेबनॉनच्या विनंतीला प्रतिसाद म्हणून चर्चेचा आदेश दिल्याचे नेतान्याहून यांनी स्पष्ट केले. हेजबोलाला नि:शस्त्र करणे आणि



शेजारी देशांमध्ये सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करणे यावर चर्चेत भर दिला जाईल त्यांनी नमूद केले. ही चर्चा वॉशिंग्टन येथे पुढील आठवड्यात होईल असे सूत्रांनी स्पष्ट केले.

अमेरिकेकडून लेबनॉनमधील अमेरिकेचे राजदूत मिशेल इस्सा आणि इस्रायलतर्फे अमेरिकेतील इस्रायलचे राजदूत येखिएल लेटर सहभागी होतील. लेबनॉनकडून कोण सहभागी होणार हे स्पष्ट झाले नाही. लेबनॉनचा समावेश युद्धविरामासंदर्भात करारामध्ये करण्याच्या मुद्द्यावरून वाद सुरू असताना इराणचे १० सदस्यांचे शिष्टमंडळ अमेरिकेबरोबर चर्चा करण्यासाठी पाकिस्तानमध्ये दाखल होत आहे. अमेरिकेचे शिष्टमंडळ उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानमध्ये येणार आहे. 'इस्रायल सातत्याने शस्त्रसंधीचे उल्लंघन करीत असल्याने इराणच्या जनतेमध्ये संशयाची भावना आहे. असे असले, तरी इराणचे शिष्टमंडळ चर्चेसाठी पाकिस्तानमध्ये येणार आहे,' अशी टिप्पणी इराणचे पाकिस्तानमधील राजदूत रेझा आमिरी मोघदम यांनी दिली. युद्ध थांबल्यानंतर तेहरानमध्ये दिवंगत सर्वोच्च नेते आयातुल्ला अली खामेनी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. खामेनी आणि त्यांच्या मुलाचे फलक नागरिकांच्या हातात होते.

### तीनशे जण ठार

इस्रायलच्या हल्ल्यात बुधवारपासून ३०० जण ठार झाल्याचे लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने सांगितले. हेजबोलाचा सरचिटणीस नईम कासीम याच्या भाच्याला ठार केल्याचा दावा इस्रालयच्या लष्कराने केला आहे. या हल्ल्यांमुळे इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंदच ठेवली असून, अमेरिकेनेही हल्ला करण्याच्या धमक्यांची भाषा सुरूच ठेवली आहे.

### ट्रम्प यांची पुन्हा धमकी

इराणने सहकार्य केले नाही, तर हल्ल्यांना पुन्हा सुरुवात होईल आणि ते इतके तीव्र असतील, की यापूर्वी असे हल्ले कुणीही पाहिले नसतील, अशी धमकी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. सध्याच्या काळात आमचे लष्कर पुढच्या विजयासाठी विश्रांती घेत आहे असे त्यांनी समाजमाध्यमावर स्पष्ट केले.

## रशियाकडून दोन दिवसांचा युद्धविराम; पुतिन यांची घोषणा

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांसाठी युद्धविरामाची घोषणा झाल्यानंतर आता, रशियाने देखील युक्रेनविरोधातील युद्धात दोन दिवसांच्या युद्धविरामाची घोषणा केली आहे. रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी ऑर्थोडॉक्स इस्टरनिमित्त दोन दिवसांच्या कालावधीसाठी युद्धविरामाची घोषणा केली आहे. युक्रेनने देखील युद्धविरामाचे पालन करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.



रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक्सवर याबाबत माहिती दिली आहे. मंत्रालयाने जाहीर केल्यानुसार, "ऑर्थोडॉक्स इस्टरच्या येऊ घातलेल्या सणाच्या निमित्ताने, ११ एप्रिल रोजी दुपारी चार वाजल्यापासून ते १२ एप्रिल रोजी दिवसअखेरपर्यंत युद्धविराम जाहीर करण्यात येत आहे," असे क्रेमलिनच्या घोषणेत म्हटले आहे. युक्रेन देखील रशियन फेडरेशनचे अनुसरण करेल, या आधारावर आम्ही पुढे जात आहोत, असेही क्रेमलिनकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

रशियाकडून युद्धविरामाची घोषणा करण्यात आल्यानंतर संरक्षण मंत्री अँद्री बेलौसोव्ह यांनी रशियाचे सर्वोच्च कमांडर, चीफ ऑफ द जनरल स्टाफ व्हॅलेरी गेरासिमोव्ह यांना लष्करी कारवाई थांबवण्याचा आदेश दिला आहे. दरम्यान, शत्रू राष्ट्राकडून कुठलाही प्रकारला हल्ला अथवा गैरप्रकार करण्याचा प्रयत्न केल्यास जशास तसे उत्तर दिले जाईल, असेही संरक्षण मंत्री अँद्री बेलौसोव्ह यांनी स्पष्ट केले आहे. पण, रशियाकडून जाहीर करण्यात आलेल्या युद्धविरामाबाबत युक्रेनकडून अद्याप कोणतेही वक्तव्य करण्यात आलेले नाही. दरम्यान, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्की यांनी आठवड्याभरापासून इस्टरच्या दिवशी युद्धविराम करण्याची मागणी केली होती. तसा प्रस्ताव त्यांच्याकडून मांडण्यात आला होता. पण, रशियाकडून ड्रोन हल्ले सुरु असल्याचे त्यांनी म्हटले होते. रशिया आणि युक्रेन दोन्ही देशांमध्ये ऑर्थोडॉक्स इस्टरचे मोठे महत्व आहे. मोठ्या उत्साहात हा सण साजरा केला जातो. सणाचे महत्व लक्षात घेता रशियाकडून युद्धविरामाची घोषणा करण्यात आली आहे. आता युक्रेन याबाबत काय निर्णय घेणार? याकडे जगाचे लक्ष लागले आहे.

## पार्थ पवार यांना सदस्यत्वाची शपथ

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते व नवनियुक्त खासदार पार्थ पवार यांनी गुरुवारी राज्यसभेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. त्यामुळे निदान महिनाभरासाठी तरी पवार कुटुंबातील तीन सदस्य वरिष्ठ सभागृहाचे खासदार असतील. शरद पवार यांनी गेल्या आठवड्यामध्ये राज्यसभेची शपथ घेतली होती, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार अजूनही या सभागृहाच्या सदस्य आहेत. बारामतीच्या पोटनिवडणुकीत ४ मे रोजी विजयी झाल्या तर त्या विधानसभेच्या सदस्य होतील, त्यानंतर त्यांची राज्यसभेतील खासदारकी संपुष्टात येईल.

'काँग्रेसची पडझड होईल', असे विधान करून वाद ओढवून घेणारे पार्थ पवार यांनी गुरुवारी उपराष्ट्रपती व राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांच्या संसदेतील दालनामध्ये इंग्रजीतून सदस्यत्वाची शपथ घेतली. या वेळी त्यांनी वडील दिवंगत अजित पवार यांचे गुलाबी रंगाचे जाकीट घातले होते. शपथविधीवेळी पार्थ यांच्याबरोबर सुनेत्रा पवार तसेच खासदार प्रफुल पटेल व सुनील तटकरे हे दोघेही उपस्थित होते. सुनेत्रा पवार यांनी बारामती मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरतानाही हे दोघे नेते उपस्थित राहिले होते. संसदेमध्ये गुरुवारी पटेल व तटकरे हजर राहिल्याने दिल्लीत पक्षनेत्यांच्या एकजुटीचे चित्र निर्माण झाले होते. गेल्या वेळी सुनेत्रा पवार संसदेत आल्या तेव्हा पटेल व तटकरे



हे दोन नेते गैरहजर होते, त्यावरून राजकीय वाद रंगला होता. या वेळी मात्र दोघेही संसदेत आले, शिवाय शपथविधी सोहळ्यानंतर पार्थ व सुनेत्रा पवार, पटेल व पक्षाचे दिल्लीत आलेले आमदार-नेते तटकरेंच्या निवासस्थानी गेले होते. पार्थ पवार यांनी राज्यसभेतील सदस्यत्वाची शपथ घेतल्यानंतर दिल्लीत कोणतीही जाहीर टिप्पणी केली नाही. राज्यसभेचे खासदार म्हणून जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा व विकासाभिमुख राजकारण करण्याचा निर्धार पार्थ पवार यांनी व्यक्त केल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

सुनेत्रा पवार यांच्याविरोधातील उमेदवारी मागे घेण्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) नेत्यांनी प्रयत्न केले नसल्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे आरोप 'राष्ट्रवादी'चे खासदार सुनील तटकरे यांनी फेटाळले. * मी व प्रफुल पटेल यांनी दिल्लीतील काँग्रेस नेत्यांशी वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न केला. केरळमध्ये असलेले मल्लिकार्जुन खरगे यांना मी ५-६ वेळा फोन केला होता.

## 'सीएपीएफ' जवानांच्या हक्कांचे संरक्षण; काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे आश्वासन

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था :

काँग्रेस सरकार सत्तेत आल्यास केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातील (सीएपीएफ) जवानांना नेतृत्वाच्या संधी नाकारणारी भेदभावपूर्ण व्यवस्था मोडीत काढली जाईल आणि जवानांना त्यांचे हक्क व विशेषाधिकार मिळवून दिले जातील, असे आश्वासन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी दिले.

केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) शौर्य दिनानिमित्त राहुल गांधी यांनी 'एक्स'वर म्हटले की, 'सीआरपीएफ शौर्य दिनानिमित्त, मी आपल्या दलातील धाडसी आणि शूर सैनिकांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. तुमचे धैर्य आणि बलिदान दररोज आपल्या राष्ट्राचे रक्षण करते. लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव, आपल्या निवडणुका शांततेत आणि सुरक्षितपणे पार पडतील याची खात्री करता.' नेतृत्वाच्या संधी नाकारण्यापासून ते वेतन, कल्याण आणि सन्मानाबाबतच्या संस्थात्मक अन्यायामुळे सैनिकांचे मनोबल खच्ची होते. ही केवळ कारकीर्दीमधील प्रगतीची बाब नाही; हा मूलभूतपणे न्याय आणि सन्मानाचा विषय आहे. काँग्रेस सरकार स्थापन झाल्यावर आम्ही ही भेदभावपूर्ण व्यवस्था मोडीत काढू आणि सीएपीएफ जवानांना त्यांचे पूर्ण हक्क आणि विशेषाधिकार मिळतील याची खात्री करू, असे आश्वासन राहुल यांनी दिले. सीएपीएफ



विधेयकाविरोधात दिल्लीत निदर्शने नवी दिल्ली : निमलष्करी जवानांचे कुटुंबीय आणि निवृत्त अधिकाऱ्यांनी बुधवारी 'केंद्रीय सशस्त्र पोलीस दल' विधेयकाविरोधात दिल्लीतील राजघाट येथे निदर्शने केली. महिलांचा अधिक सहभाग असलेल्या या निदर्शकांनी 'सीएपीएफ (सामान्य प्रशासन) विधेयक, २०२६' हे विधेयक मागे घ्यावे आणि या दलांमधील संवर्ग अधिकारी व जवान यांना वेळेवर पदोन्नती द्यावी, अशी मागणी केली.

## 'सीडीआर' चौकशीवरून सुबोध सावजींचे मुख्यमंत्र्यांना पत्र

■ मुंबई/वृतसंस्था



अंजली दमानिया यांना 'सीडीआर' कसे मिळतात, याची चौकशी करण्यापेक्षा महाठग अशोक खरात आणि बड्या नेत्यांमधील संभाषणाची चौकशी करून ते जाहीर करा, अशी मागणी माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी केली आहे. या संदर्भात सावजी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट पत्र लिहिल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

काही दिवसांपूर्वी अंजली दमानिया यांनी काही माहिती समोर आणली होती, ज्यावरून त्यांच्याकडे कॉल डिटेल्स कसे आले, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. मात्र, सुबोध सावजी यांनी या प्रकरणात एक नवीन वळण दिले आहे. त्यांच्या मते, दमानिया यांनी मिळवलेली माहिती ही एका मोठ्या घोटाळ्याचा किंवा गुन्ह्याचा पर्दाफाश करू शकते.

अशोक खरातच्या संबंधांची चौकशी करा: महाठग अशोक खरात याची पूर्णपणे चौकशी सुरू आहे. त्याचे कोणाशी संबंध होते आणि त्याने कोणाशी काय संभाषण केले, हे तपासून जाहीर करणे आवश्यक आहे. चौकशीची दिशा चुकतेय का?: दमानिया यांना सीडीआर कसे मिळाले, या गौण प्रश्नावर वेळ घालवण्यापेक्षा, त्या सीडीआरमधून समोर आलेली माहिती खऱ्या सूत्रधारांपर्यंत पोहोचण्यासाठी महत्त्वाची ठरू शकते, असे सावजी यांनी पत्रात म्हटले आहे. मंत्रिमंडळातील नेत्यांवर निशाणा: सावजी यांनी पत्रात अत्यंत गंभीर आरोप केला आहे की, "या प्रकरणात मंत्रिमंडळातील काही बडे नेते अडकण्याची शक्यता आहे. त्यामुळेच दमानियांच्या चौकशीचा फेरा लावून सरकार आपल्याच मंत्र्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे का?" असा रोखठोक सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

## पेट्रोल पंपावरील घटनेने जिल्हा हादरला..

# छत्रपती संभाजीनगरमध्ये भरदिवसा प्रेयसीची गळा चिरून हत्या;




### शाब्दिक चकमक अन् थेट गळ्यावर वार

पूजा गावंडे ही तरुणी नेहमीप्रमाणे इंडियन ऑईल पेट्रोल पंपावर आपली ड्युटी करत होती. दुपारी साडेबाराच्या सुमारास तिचा प्रियकर सत्यम रावसाहेब गावंडे तिथे पोहोचला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सुरुवातीला त्या दोघांमध्ये कोणत्यातरी कारणावरून बाचाबाची सुरू झाली. दोघांमधील हा वाद क्षणाक्षणाला वाढत गेला. संतापाने बेभान झालेल्या सत्यमने आपल्या खिशातील चाकू बाहेर काढला आणि काहीही विचार न करता पूजाच्या गळ्यावर सपासप वार केले. हा हल्ला इतका अनपेक्षित आणि भीषण होता की पूजाला सावरण्याची संधीही मिळाली नाही. चाकूचा वार वर्मी लागल्याने आणि मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्यामुळे पूजा रक्ताच्या थारोळ्यात तिथेच कोसळली. उपस्थित लोकांनी मदतीसाठी धाव घेण्यापूर्वीच तिचा जागीच मृत्यू झाला होता. भरवस्तीत घडलेल्या या प्रकारामुळे पेट्रोल पंपावरील कर्मचारी आणि नागरिक सुन्न झाले आहेत.

■ छत्रपती संभाजीनगर/वृत्तसंस्था

जिल्ह्यातील करमाड परिसरात आज दुपारी माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत भीषण घटना घडली. एका माथेफिरू तरुणाने आपल्याच प्रेयसीचा भरवस्तीत निर्घृण खून केल्याने संपूर्ण परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेने केवळ कायदा-सुव्यवस्थेचे वाभाडे काढले नसून, महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीररित्या ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पूजा सुदाम गावंडे ही तरुणी करमाड येथील गणपती मंदिराजवळ असलेल्या इंडियन ऑईल पेट्रोल पंपावर कामाला होती. आज दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास, जेव्हा पेट्रोल पंपावर नेहमीप्रमाणे लोकांची वर्दळ होती, तेव्हा तिचा प्रियकर त्या ठिकाणी पोहोचला. काही कळण्याच्या आतच, त्याने खिशातून चाकू काढून पूजाच्या गळ्यावर सपासप वार केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पूजाचा जागीच मृत्यू झाला. भरदिवसा आणि लोकांच्या प्रत्यक्ष डोळ्यादेखत घडलेल्या या थरारामुळे पेट्रोल पंपावरील कर्मचारी आणि ग्राहक स्तब्ध झाले. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. आरोपीने इतक्या धाडसाने हे कृत्य केल्यामुळे पोलिसांच्या गस्तीवर आणि गुन्हेगारांवरील धाकावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. करमाड पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, आरोपीला कठोर शिक्षा करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

करमाड येथील पेट्रोल पंपावर घडलेल्या पूजा गावंडे हत्या प्रकरणाने आता एक नवे वळण घेतले आहे. या घटनेचा अंगावर शहारे आणणारा व्हिडिओ समोर आला असून, आरोपीने केवळ पूजाची हत्याच केली नाही, तर तिला वाचवण्यासाठी येणाऱ्यांनाही जीवे मारण्याची धमकी दिल्याचे उघड झाले आहे. ज्यावेळी सत्यम गावंडे पूजावर चाकूने वार करत होता, तेव्हा पंपावरील एका व्यक्तीने मोठ्या धैर्याने तिला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र, रक्ताने माखलेला चाकू हवेत फिरवत आरोपीने त्या व्यक्तीलाही धाक दाखवला आणि मागे हटण्यास भाग पाडले. उपस्थित नागरिकांच्या डोळ्यादेखत हा थरार घडला आणि या दहशतीचा फायदा घेत आरोपी सत्यमने घटनास्थळावरून पळ काढला. घटनेची भीषणता पाहून करमाड पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी पंचनामा करून पूजाचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी (Post-mortem) रुग्णालयात पाठवला आहे. प्राथमिक माहितीनुसार, या हत्येमागे प्रेमप्रकरणातील जुना वाद किंवा चारित्र्याचा संशय असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. फरार आरोपी सत्यम गावंडेच्या शोधासाठी करमाड पोलिसांनी विशेष पथके रवाना केली आहेत. सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे हत्या करण्याचे धैर्य गुन्हेगारांमध्ये येतेच कसे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

## नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत महिलांचा विनयभंग आणि अत्याचार

**नाशिक :** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण ताजे असताना आता नाशिकमधील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार आणि धार्मिक भावना दुखावल्याचा खळबळजनक प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी आतापर्यंत एकूण 9 गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी या प्रकरणात तत्परता दाखवत 6 संशयित आरोपींना अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंपनीत कार्यरत असलेल्या काही पुरुष कर्मचाऱ्यांकडून महिलांचा गेल्या काही 2 वर्षांपासून मानसिक आणि लैंगिक छळ सुरू होता. अखेर पीडित महिलांनी तक्रार केल्यानंतर या प्रकाराची भीषणता समोर आली आहे. प्रकरणाचे गांभीर्य आणि संवेदनशीलता ओळखून नाशिक शहर पोलीस आयुक्तांनी या तपासासाठी SIT स्थापन केली आहे आहे.या घटनेच्या पार्श्वभूमीवर, पोलीस प्रशासनाने सर्व खाजगी आस्थापनांना सदर ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे कडक निर्देश दिले आहे. कामाच्या ठिकाणी महिलांना कोणताही त्रास होत असल्यास त्यांनी न घाबरता पुढे यावे, असे आवाहन देखील शहर पोलिसांकडून करण्यात आले आहे. ज्यासाठी अधिकृत व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक ९९२३३२३३११ वर मेसेज पाठवू शकतात किंवा आपत्कालीन परिस्थितीत ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवली जाईल असे देखील यावेळी सांगण्यात आले आहे.एकूण ८ पीडित महिला यांनी या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. तर एका पुरुषाने देखील दिलेल्या तक्रारीहून 1 गुन्हा असे एकूण 9 गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## पांडुरंग अन् भारत सरकार लिहिलेली कार, व्यावसायिकाला घाटात पकडलं

■ रत्नागिरी/वृत्तसंस्था



पांडुरंग लिहिलेली थार गाडी व भारत सरकार असा लोगो असलेली इनोव्हा गाडी दोन्ही गाड्यांमधून पटापट काहीजण उतरले आणि गाडीत जबरदस्ती कोंबून घेऊन रोकड लुटल्याचा मोठा प्रकार घडला आहे. कोकण पश्चिम महाराष्ट्र जोडणाऱ्या आंबा घाटातील थरारक प्रकार काल बुधवारी रात्रीच्या सुमारास घडला आहे. मात्र, देवरुख पोलिसांनी अवघ्या काही तासात तपासाची सूत्र हलवत पाच जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत. रत्नागिरी ते कोल्हापूर मार्गावर आंबा घाटातील दख्खन येथे म्हैस घेऊन जाणाऱ्या एका व्यावसायिकाला अडवून, चाकूचा धाक दाखवत मारहाण आणि लूटमार करणाऱ्या टोळीचा देवरुख पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी पाच आरोपींना बेड्या ठोकल्या असून त्यांच्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी येथील प्रथमेश तानाजी दळवी हे काल रोजी सायंकाळी रत्नागिरीतील वेतोशी येथून आपल्या बोलेरो गाडीत म्हैस घेऊन कोल्हापूरच्या दिशेने जात होते. सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास आंबा घाटातील दख्खन येथे पांडुरंग लिहिलेली थार गाडी आणि भारत सरकारचा लोगो लावलेल्या इनोव्हा गाडीतून आलेल्या आठ जणांनी दळवी यांची गाडी अडवली. आरोपींनी त्यांना गाडीतून खाली ओढून बेदम मारहाण केली आणि चाकूचा धाक दाखवत जबरदस्तीने इनोव्हा गाडीत कोंबले. तेथून त्यांना साखरपा येथील गंद्रे पेट्रोल पंपावर नेण्यात आले. तिथे आरोपींनी ५० हजार रुपयांची मागणी केली आणि दळवी यांच्या गाडीतील केबिनमध्ये ठेवलेले २५ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले. 'जर पोलिसांत तक्रार केली तर याद राख,' अशी धमकी देऊन आरोपी पसार झाले होते.या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपविभागीय अधिकारी सुरेश कदम व त्यांच्यासोबत अवघ्या तीन पोलिसांच्या टीमने घाट परिसर पिंजून काढला. त्याचवेळेला एका आड वाटेला असलेल्या पांडुरंग कृपा वर्णनाची गाडी दिसली व त्याचठिकाणी हे सगळे संशयित आरोपी दारू पिताना बसलेले दिसले. अवघ्या तीन जणांच्या पोलीस पथकाने क्षणाचाही विलंब न करता कौशल्य पणाला लावत पाच जणांच्या मुसक्या आवळल्या. या घटनेतील दोन जण पळून जाण्यास यशस्वी ठरले असून त्यांचा शोध सुरू आहे. पकडलेल्या पाच जणांना देवरुख न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# भाविकांच्या वाहनाला अपघात दोन महिला ठार; 38 भाविक जखमी

■ बुलढाणा/प्रतिनिधी



काशिविश्वनाथ दर्शनासाठी नेपाळकडे जाणाऱ्या महाराष्ट्रातील यात्रेकरुंच्या बसला वाराणसी-गोरखपुर महामार्गावरील गाजीपुर जवळ अपघात झाला. या अपघातात दोन महिलांचा घटनास्थळीच मृत्यू झाला आहे. यातील एक महिला बुलढाणा जिल्हयातील तर दुसरी महिला अकोला जिल्हयातील रहिवाशी आहे. तर अपघातात 38 भाविक जखमी झाले आहे. जखमींना वैद्यकिय महाविद्यालयात उपचारास्तव दाखल केले असुन अपघाताची माहिती मिळताच केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधुन जखमींना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देशित केले.

जय श्रीराम टुर्स ॲड ट्रॅव्हल्स कंपनीच्या वतीने आयोजीत देवदर्शन पर्यटन यात्रे निमित्त महाराष्ट्रातील 38 भाविक अयोध्या व इतर तिर्थक्षेत्र दर्शनाकरीता निघाले होते. दरम्यान गुरूवार 9 एप्रिल रोजी यात्रेकरु भाविकांची बस वाराणसी-गोरखपुर या महामार्गाने मार्गक्रम करत असतांनाच सकाळी 11.30 च्या सुमारास उत्तर प्रदेशातील गाजीपुर जवळील नंदगज येथे या बसला अपघात घडला. यामध्ये अकोला येथील 50 वर्षीय अन्नपुर्णाबाई तर बुलढाणा जिल्हयातील मोताळा तालुक्यातील रोहिणखेड येथील सरस्वतीबाई पाखरे यांचा समावेश आहे. उर्वरीत 35 यात्रेकरु या अपघातात जखमी झाले आहेत. जखमींना वैद्यकिय महाविद्यालयात उपचारास्तव दाखल केले आहे. यातील तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. तर उर्वरीत 32 यात्रेकरु किरकोळ जखमी आहेत.

तर केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांचे सहाय्यक खाजगी सचिव डॉ.गोपाल डिके, आचल भाटीया हे मदतीसाठी गाजीपुरकडे रवाना झाले आहेत. तर दिल्ली येथील मंत्रालयातूनही संबधितांना निर्देशित करुन अपघातग्रस्तांना मदत करण्याचे काम केल्या जात आहे.

# दिल्लीच्या हातून सामना निसटला; हातातली मॅच गमावल्यामुळे अक्षर पटेल भडकला



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आयपीएल 2026 चा 14 वा सामना 8 एप्रिल रोजी अरुण जेटली स्टेडियमवर खेळला गेला, ज्यात दिल्ली कॅपिटल्सचा केवळ एका धावेने पराभव झाला. गुजरात टायटन्सने 211 धावांचे लक्ष्य उत्कृष्टपणे राखले. दिल्लीला निर्धारित 20 षटकांत 8 गडी गमावून केवळ 209 धावा करता आल्या. केवळ एक धावेने सामना गमावल्यानंतर कर्णधार Axar Patel काय म्हणाला पाहा.म्हणाला की, "दोन्ही संघांनी उत्कृष्ट क्रिकेट खेळले आणि अशा अटीतटीच्या सामन्यांमध्ये निकाल कोणाच्याही बाजूने लागू शकला असता. तो पुढे म्हणाला की, अटीतटीच्या सामन्यांमध्ये तुम्ही अनेक गोष्टींवर बोट ठेवू शकता, पण त्याला वाटते की जर ते महत्त्वाच्या क्षणी थोडे अधिक हुशारीने खेळले असते, तर कदाचित त्यांच्या विकेट्स पडल्या नसत्या. केएल राहुलविषयी बोलताना अक्षर म्हणाला की, पॉवरप्लेनंतरही ज्या प्रकारे केएलने सामन्याची गती कायम ठेवली ते उत्कृष्ट होते आणि त्याला आशा आहे की पुढच्या वेळी तो सामना पूर्ण करेल."दिल्लीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना, गुजरात टायटन्सने 4 गडी गमावून 210 धावा केल्या. कर्णधार शुभमन गिल, जोस बटलर आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी गुजरातसाठी अर्धशतके झळकावली. गिलने 45 चेंडूंमध्ये 70 धावांची खेळी केली. दरम्यान, बटलरने 27 चेंडूंमध्ये 52 धावांची वेगवान खेळी केली, तर वॉशिंग्टन सुंदरने 32 चेंडूंमध्ये 55 धावा केल्या. दिल्लीकडून मुकेश कुमारने सर्वाधिक दोन बळी घेतले. लुंगी एनगिडी आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. दिल्लीकडून डेव्हिड मिलरने 20 चेंडूंमध्ये नाबाद 42 धावा केल्या. के एल राहुलने 52 चेंडूत 92 धावांची खेळी खेळली. शतकाच्या अगदी जवळ असताना तो बाद झाला. गुजरातकडून रशीद खानने 3 आणि प्रसिद्ध कृष्णाने 2, मोहम्मद सिराजने एक बळी घेतले. या हंगामातील गुजरातचा हा पहिला विजय आहे. यापूर्वी, गुजरातने मागील दोन सामने गमावले होते.

गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सकडून विजय हिसकावून घेतला. गुजरातने हा सामना एका धावेने जिंकला. दिल्लीला शेवटच्या दोन चेंडूंवर दोन धावांची गरज होती, पण मिलरने कुलदीपसोबत एकही धाव घेतली नाही आणि शेवटच्या चेंडूवर कुलदीप धावबाद झाला. मिलरच्या चुकीमुळे दिल्लीला दोन गुण गमवावे लागले.

## वर्ल्ड चॅम्पियनला हरवत प्रथमच फायनलमध्ये

**येओसू (कोरिया)/वृत्तसंस्था**

थॉमस कप, आशियाई अजिंक्यपद अशा बॅडमिंटनमधील आव्हानात्मक स्पर्धा जिंकणाऱ्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या बॅडमिंटन दुहेरीतील जोडीने शनिवारी कोरिया ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. ४० मिनिटे रंगलेल्या उपांत्य फेरीत सात्विक-चिराग यांनी जागतिक रँकिंगमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या लियांग वी केंग-वँग चँग या चिनी जोडीचे आव्हान २१-१५, २४-२२ असे मोडून काढले.बॅडमिंटनविश्वात 'सातचि' या टोपण नावाने ओळखल्या जाणाऱ्या



चिराज-सात्विकची ही यंदाच्या मोसमातील तिसरी अंतिम फेरी आहे. जागतिक दुहेरीच्या रँकिंगमध्ये तिसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या सात्विक-चिरागने यंदा स्विस ओपन सुपर ३०० (मोसमाच्या पूर्वार्धात) आणि इंडोनेशियन ओपन सुपर १००० या स्पर्धा (गेल्या महिन्यात) जिंकल्या आहेत.पहिल्या गेममध्ये ७-७ अशा गुणांपर्यंत प्रतिस्पर्ध्यांत बरोबरी होती. नंतर मात्र सात्विक-चिरागने आघाडी घेत १४-८ असे वर्चस्व निर्माण केले. अन् पुढे हा गेम २१-१५ असा खिशात टाकत सामन्यात आघाडी घेतली. दुसऱ्या गेममध्येही सुरुवातीपासून चढाओढ दिसली. सात्विक-चिरागने १२-८ अशी आघाडीही घेतली. मात्र लियांग वी केंग-वँग चँग हे सहज हार माणारे नव्हते. त्यांनी सात्विक-चिराग यांना १८-१८ असे गाठले. सामन्यातील रंगत वाढत असताना प्रतिस्पर्ध्यांकडून चुकाही झाल्या. सात्विक-चिराग यांनी आपल्याच सर्व्हिसवर दोनवेळा टाळता येण्याजोग्या चुका केल्या.

मध्येच सर्व्हिसही तोकडी पडत होती. सात्विक-चिरागला तीन 'मॅच पॉइंट'ही लाभले, पण तेही गमावले. अखेर लक्षकेंद्रित करत सात्विक-चिरागने गुणांची कमाई करत दुसरा गेम आणि लढत जिंकली. आणखी एका स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारता आल्याने छान वाटते आहे. सिंगापूर स्पर्धेत आमच्यावर पहिल्याच फेरीत गारद होण्याची नामुष्की आली होती. त्यानंतर. या स्पर्धेत भाग घेताना, शंभर टक्के योगदान द्यायचे एवढेच मनात होते. जय, पराजय हा खेळाचा भागच असतो; पण सर्वोत्तम कामगिरीच केली नाही, या भावनेने सामन्यातून बाहेर पडायचे नव्हते. शनिवारी शटलचा वेग खूप होता. त्यामुळे ते फार वर उसळणार नाही, याची खबरदारी आम्ही घेतली -चिराग शेट्टीसात्विक-चिराग यांनी कारकिर्दीत प्रथमच केंग-वँग या चिनी (जागतिक रँकिंग २) जोडीवर विजय मिळवला. याआधीच्या दोन्ही लढतींत सात्विक-चिराग यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. यंदा मार्चमध्ये ऑल इंग्लंड अजिंक्यपद स्पर्धेतही या दोघांविरुद्ध सात्विक-चिरागचा पराभव झाला होता.

## जय-'सुर्या'मुळे आमचा संघ कोलमडला, जयवर्धनेंकडून कौतुक

**मुंबई/वृत्तसंस्था**

'यशस्वी जयस्वाल आणि वैभव सूर्यवंशी यांच्या वादळी फलंदाजीपुढे आमचा संघ पूर्णपणे कोलमडला. आमच्या गोलंदाजांचा टप्पाही चुकला', ही बाब मान्य केली ती मुंबई इंडियन्सचे मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने यांनी. आयपीएल टी-२० साखळी लढतीत यजमान राजस्थान रॉयल्सकडून मंगळवारी मध्यरात्री २७ धावांनी पराभव पत्करावा लागल्यानंतर 'मुंबई'चे प्रशिक्षक जयवर्धने यांनी पत्रकार परिषदेत ही टिप्पणी केली.आमच्या गोलंदाजांना दिशा आणि टप्पाही राखता नाही. जसप्रीत बुमराहसारखा दर्जेदार वेगवान गोलंदाजही 'लेंथ' मध्ये थोडासा चुकलाच', असे जयवर्धने यांनी मान्य केले. पावसाचा फटका बसल्याने गुवाहाटी येथे झालेला हा सामना ११ षटकांचा घेण्यात आला. जयस्वाल आणि सूर्यवंशी यांच्या वादळी फलंदाजीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने तीन फलंदाजाच्या मोबदल्यात १५० धावा केल्या. जणू हार मान्यच केलेल्या मुंबई इंडियन्सने नऊ फलंदाजांच्या मोबदल्यात १२३ धावा केल्या.घरच्या मैदानावर कोलकाता नाइट रायडर्सविरुद्ध विजय मिळवत मोसमाची सुरुवात करणाऱ्या मुंबई इंडियन्सचा हा सलग दुसरा पराभव होता. 'आम्ही निष्प्रभ ठरलो. विविध पैलूंवर आम्हाला काम करावे लागेल. आम्ही रणनीती ठरवली होती; पण त्याची अंमलबजावणी करू शकलो नाही. सूर्यवंशी आणि जयस्वाल फॉर्मात असल्याने आम्हाला पुढील धोक्याची जाणीव होती, त्यात षटके कमी झाल्यामुळे फलंदाजांना सुरुवातीपासूनच आक्रमक होण्याची मोकळीकच मिळते', असे जयवर्धने यांचे म्हणणे आहे. 'चार, पाच षटकांतच भरकटलो' 'पहिली चार-पाच षटके महत्त्वाची होती. मात्र त्याच षटकांत आमच्या माऱ्याचा दिशा आणि टप्पा भरकटला. 'राजस्थान'ने मात्र चांगली फलंदाजी केली', असं जयवर्धने यांनी सांगितलं.जसप्रीत बुमराह यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या गोलंदाजालाही 'राजस्थान' दोन्ही सलामीवीरांच्या आक्रमक पवित्र्यासमोर झुंजावे लागले.

## डेव्हिड मिलरला व्हिलन ठरवू नका; गावस्करांनी सांगितलं, तो का पळाला नाही

**गुवाहाटी/वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ मधील १४ वा सामना दिल्ली कॅपिटल्स वि गुजरात टायटन्स यांच्यामध्ये पार पडला. शेवटच्या चेंडूपर्यंत गेलेल्या सामन्यात गुजरात संघाने अवघ्या १ धावेने विजय मिळवला, डेव्हिड विजय अगदी शेवटपर्यंत हिरो ठरलेला पण पाचव्या आणि सहाव्या चेंडूवर सर्व सामना फिरला. पाचव्या चेंडूवर त्याने धाव घेणं टाळलं, पण सहाव्या चेंडूवर बॉल मिस झाला आणि पराभवाचा सामना करावा लागला. या सामन्यानंतर मिलरला सगळे व्हिलन ठरवत आहे. कारण त्याने पाचव्या चेंडूवर एक धाव घेतली असती तर सामना टाय झाला असता आणि जरी कुलदीप यादव आऊट झाला असता तर किमान टायनंतर निकाल ठरला असता.






हातातोंडाशी आलेला विजयाचा घास गुजरातने हिसकावून घेतला. पण डेव्हिड मिलर याच्यावर जोरदार टीका होत आहे. अशातच यावर माजी खेळाडू सुनील गावस्कर यांनी मिलरला सपोर्ट केला असून त्यांनी मिलरने घेतलेल्या निर्णयामागचे कारण सांगितले आहे.डेव्हिड मिलर विनिंगशॉट मारण्यासाठी त्याने स्वत:कडे स्ट्राईक ठेवली असावी. पण कुलदीप यादव याने ज्या प्रकारे पहिला बॉल खेळताना त्याला स्ट्राईक दिली होती, ते पाहत कुलदीपला शेवटच्या चेंडूवर त्याने स्ट्राईक द्यायला हवी होती. पण हे ही तितकंच सत्य आहे की, त्याने आधीच्या ओव्हरमध्ये केलेली फटकेबाजी पाहता त्याला विश्वास होता की तो करू शकतो. त्यामुळे मिलरला दोष देत बसू नका. त्याने जा पद्धतीने विचार केलेला त्यामध्ये तो अपयशी ठरला कारण प्रसिध कृष्णानेही चांगली बॉलिंग केली, असं सुनील गावस्कर म्हणाले. पॉवरप्लेमध्ये ६८... त्यानंतरच्या डावाच्या मधल्या नऊ घटकांत ९३ धावा चोपणारे गुजरात टायटन्सला अखेरच्या पाच षटकांत ४९ धावाच करणे शक्य झाले. अर्थात सुरुवातीच्या षटकातील आक्रमकतेच्या जोरावर 'गुजरात' ने आयपीएल टी-२० क्रिकेटमधील दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या लढतीत २१० धावा केल्या. शुभमन गिल, जोस बटलर आणि वॉशिंग्टन सुंदरच्या अर्धशतकाच्या जोरावर 'गुजरात' ने ही मजल मारली. या सामन्याचा पाठलाग करताना दिल्लीकडून सुरुवातीपासून के.एल. राहुल शेवटपर्यंत मैदानात टिकून होता. पण ९२ धावांवर असताना मोक्याच्या वेळी तो आऊट झाला. पण तरीसुद्धा मिलरने हार न मानता सामना पूर्णपणे एकट्याच्या जोरावर खेचला होता. पण शेवटच्या ओव्हरमधील पाचव्या आणि सहाव्या चेंडूवर सामना गुजरातच्या बाजूने फिरला.दरम्यान, या सामन्यामधील पराभवानंतर दिल्लीचा पहिला पराभव ठरला आहे. कारण दिल्लीने सलग दोन सामने जिंकत दमदार सुरूवात केली होती. पण सामन्यातील पराभवामुळे त्यांच्या विजयाची हॅट्रिक हुकली.

# सिनेमाच्या शूटिंगसाठी मी जंगलात राहायचे' पूजा सावंतने सांगितला 'जंगली' सिनेमाचा अनुभव

सुप्रसिद्ध अभिनेत्री आणि नृत्यांगना पूजा सावंत सध्या तिच्या 'सालबर्डी' या सिनेमामुळे चर्चेत आहे. या सिनेमात तिनं पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारली आहे. पूजानं आजवर अनेक गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केलंय. मराठीसोबतच अभिनेत्रीनं बॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे, पूजा सावंतने 'जंगली' या हिंदी सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. या सिनेमात तिनं विद्युत जामवालसोबत काम केलंय. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीत अभिनेत्रीनं सिनेमाच्या शूटिंगचा अनुभव सांगितलाय. सालबर्डी' या सिनेमाच्या निमित्तानं पूजा सावंतने 'महाराष्ट्र टाइम्स मनोरंजन'ला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान 'जंगली' सिनेमाच्या शूटिंगचा अनुभव सांगताना पूजा म्हणाली, 'आम्ही या सिनेमाचं शूटिंग चँगमायला केलं. तेव्हा शूटिंगच्या १५ दिवस अगोदर तिथे गेले. कारण, मला त्या हत्तीणीसोबत मैत्री करायची होतं. तिच्यासोबत मैत्री झाली नसती तर आमचे सीन झालेच नसते. चित्रपटात मी तिला अंघोळ घालते. मी तिच्यावर बसते. तिच्यासोबत जंगलात फिरायला जाते. हे सगळं एका भेटीत नाही होत. ते





कनेक्शन असावं लागतं. देवाच्या कृपने माझं तसं प्राण्यांशी कनेक्शन आहे. त्याच्यामुळे ते छान पद्धतीने जमलं. त्यामुळे हा सिनेमा माझ्यासाठी आयुष्यभराचा अनुभव देणारा ठरला.'विद्युत जमवालबद्दल बोलताना अभिनेत्री म्हणाली, 'विद्युत जामवाल हा एक चांगला सहकलाकार आहे. त्याची लीड म्हणून मला काम करता आलं. सिनेमात मी हत्तींबरोबर काम करत होतेच. पण, आयुष्यात डिसीप्लीन काय असतं? हे मी विद्युतमुळे खूप जवळून पाहिलं. तो ज्या पद्धतीने स्वत:ला मेंटेन करतो. शिवाय तो इतरांना ज्या पद्धतीने प्रेरणा देतो ते सगळं वाखाणण्याजोगं आहे. त्याने मला बऱ्याचदा वर्कआऊटसाठी मार्गदर्शन देखील केलं आहे.''सिनेमाचं शूटिंग करताना मी हॉटेलमध्ये नाही, तर त्या जंगलात राहिले होते. त्यावेळी मला त्या हत्तीणीला भेटायला जंगलात पहाटे जावं लागायचं. तिथे जंगलात एका झाडाखाली छोटंसं गणपतीचं मंदिर होतं. मी रोज पहाटे तिकडे त्या गणपतीसमोर अर्थवशीर्ष म्हणायचे. त्यानंतर मी ज्या ठिकाणी हत्ती बसलेले असायचे तिकडे जायचे. मग मी माझी जी हत्तीण होती तिच्याकडे जायचे आणि तिला खायला घालायचे. त्यानंतर मग ते सगळे हत्ती पाण्यात पोहोयला उतरायचे. हे सलग मी १० दिवस तिथे केलं. मग माझी आणि त्या हत्तीणीची कमालच मैत्री झाली.'

## धुरंधरच्या सेटवर जास्त कोणासोबत बोलायचा नाही अक्षय खन्ना

अक्षय खन्नानं आदित्य धरच्या 'धुरंधर' या चित्रपटात रेहमान डकैतची भूमिका साकारलेली. अक्षयच्या अभिनयाचं सर्वत्र कौतुक झालं. अक्षय खन्नानं जवळपास ३० वर्षांपूर्वी बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं आणि त्याच्या अनेक अभिनयांसाठी कौतुकाची थाप मिळवली आहे. परंतु गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये 'धुरंधर' प्रदर्शित झाल्यानंतर अक्षयची लोकप्रियता अधिकच वाढली. अशातच आता, 'धुरंधर' या सिनेमात उझैर बलोचची भूमिका साकारलेल्या दानिश पंडोरनं अक्षय खन्नाबद्दल आपलं मत व्यक्त केलं आहे आणि तो सेटवर कसा वागायचं याबद्दल सांगितलं आहे.दिलेल्या मुलाखतीत दानिश म्हणाला, 'अक्षय सर्वांशी खूप चांगल्या प्रकारे वागतो. तो खूप मनमिळाऊ आहे. तो जास्त बोलत नाही, हे खरं आहे. पण तुम्ही त्याला काहीही विचारल्यास तो लगेच उत्तर देतो.'दानिश पुढे म्हणाला, 'तो असं नाही म्हणत की, 'अरे, मला तुझ्याशी बोलायचं नाही.' तो एक खूप चांगला माणूस आहे. पण, तो सिनेमाच्या सेटवर एका वेगळ्याच जगात जातो. तो नेहमी त्याच्या भूमिकेवर लक्ष केंद्रित करतो. कॅमेरा सुरू




होताच, तो स्वतःला त्या भूमिकेत पूर्णपणे झोकून देतो. तो सेटवर फोन घेऊनसुद्धा बसत नाही. तो एका कोपऱ्यात शांतपणे बसतो आणि कोणी सांगितल्याशिवाय कोणाशीही बोलत नाही. तो एक खूप चांगला माणूस आहे. तो शांतपणे बसतो, स्वतःच्या विश्वात रमतो आणि आपल्या अभिनयाबद्दल विचार करतो.'धुरंधर'मध्ये अक्षय खन्नानं लयारीचा गँगस्टर रेहमान डकैतची भूमिका साकारली होती. चित्रपटात रेहमान डकैत लयारीमध्ये आपली सत्ता मजबूत करण्यासाठी राजकारणात प्रवेश करतो, हे दाखवलं आहे. चित्रपटाच्या शेवटी हमजा त्याची हत्या करतोअक्षय खन्नाच्या आगामी चित्रपटांबद्दल बोलायचं झाल्यास, तो आता पॅन-इंडिया चित्रपट 'महाकाली'मध्ये असुरगुरू शुक्राचार्यांच्या भूमिकेत दिसणार आहे.

## सध्याचा काळ विचित्र आहे, कोणत्याही मुद्द्यावरून कलाकृतीला विरोध होऊ शकतो: जीजिविषा काळे

पहिल्या सिनेमाला यश मिळणं, हे कुणाही 1 दिग्दर्शकाला पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देणारी गोष्ट. मात्र, उत्तम आशय हा नेहमीच प्रेक्षकांच्या प्रतिसादाबद्दल आत्मविश्वास देण्याचं काम करतो. 'तिघी' या सिनेमाच्या कथेनं मला आत्मविश्वास दिला आणि चांगली मंडळी पाठीशी उभी राहिल्यानं हा सिनेमा साकारला, असं दिग्दर्शक जीजिविषा काळे हिनं सांगितलं.

तिघी' हा सिनेमा मोठ्या सिनेमांसमोर उभा राहिला आणि आजही त्याचे शो सुरू आहेत. या यशाबद्दल जीजिविषा म्हणाली, 'मी प्रेक्षकांसह सिनेमाचे निर्माते आणि वितरकांचे आभार मानते. कथेबाबत मला आत्मविश्वास होताच; पण प्रेक्षकांनी त्यांची जबाबदारी असल्याप्रमाणे सिनेमा उचलून धरला. पुणे-मुंबईत त्याला प्रतिसाद मिळाला आणि नागपूर, नाशिक इथे शो लावून घेतले आणि ते प्रेक्षकांनी पाहिलेही. मोठ्या सिनेमांच्या गर्दीत हा सिनेमा इतका काळ टिकवून ठेवणं आव्हानात्मक होतं. त्याची गणितं फार वेगळी असतात. सिनेमा चांगला असून असून चालत नाही, तर तो पोहोचवावाही लागतो. निर्माते आणि वितरकांनी ते काम नेटानं केलं.'नातेसंबंधांबाबतचे विषय अनेकदा अंगलट येण्याची शक्यता असते. नावांसह त्यातील जातीय वा इतर मुद्दे काढून टीका होऊ शकते. त्याबाबत जीजिविषा म्हणाली, 'सध्याचा काळ विचित्र आहे. कोणत्याही मुद्द्यावरून कलाकृतीला विरोध होऊ शकतो. मात्र, हा विषय आम्ही अतिशय संवेदनशीलतेनं हाताळला. घरातच मुलींना त्रास होण्याच्या घटना माझ्या परिचयातल्या व्यक्तिंसोबत घडल्या आहेत. मराठी प्रेक्षक सुजाण आहेत. ज्या पद्धतीनं या गोष्टी मांडल्या गेल्या, ते प्रेक्षकांनी समजून घेतलं.






विषयाचं गांभीर्य ओळखून त्याची चर्चा केली. अनेकांनी मला प्रतिक्रिया दिल्या.'स्त्री दिग्दर्शक या मुद्द्यावर ती म्हणते, 'दिग्दर्शक झाल्यावर तुम्ही विषय कसा मांडता हा मुद्दा तुमच्या स्त्री वा पुरुष असण्यापेक्षा जास्त महत्त्वाचा असतो. कदाचित संधी मिळणं, धाडस करणं, धाडसानं या प्रक्रियेला सामोर जाणं आणि संख्यात्मक तुलना यामुळे स्त्री वा पुरुष दिग्दर्शक असा फरक केला जात असावा. मी या दृष्टिकोनातून विचार न करता कथा आणि त्याच्या मांडणीबाबत, या कथेतल्या भूमिका प्रेक्षकांना पटणं, दिग्दर्शक म्हणून आपण त्या कथेबाबत प्रेक्षकांना तो विश्वास देणं आणि ते त्या विश्वासाला जागतील, यावर विश्वास ठेवणं महत्त्वाचं असतं. चांगले निर्माते सादरकर्ते, कलाकार आणि टीम हाताशी असली, की ते घडतं.'दिग्दर्शक म्हणून मला नवनवीन काय करता येतील, यासाठी मी प्रयत्न करत राहणार आहे. यापुढेही मला स्त्रीप्रधान कथा सांगायला आवडतील.

## भूत बंगला ' सिनेमाच्या शूटिंगदरम्यान स्टंट करताना अक्षयला दुखापत

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारला त्याच्या आगामी 'भूत बंगला' या हॉरर-कॉमेडी चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान स्टंट करताना दुखापत झाली. चित्रपटाच्या निर्मात्यांनी गुरुवारी शेअर केलेल्या एका behind the scenes व्हिडिओमध्ये, अभिनेता ॲक्शन सीन करताना दिसतोय.आपले अनेक स्टंट्स स्वतःच करण्यासाठी प्रसिद्ध असलेला अक्षय या व्हिडिओमध्ये, हवेत उडी मारून 'जंप किक' मारताना दिसतोय. मात्र, जमिनीवर उतरताना अभिनेत्याचा पाय घसरला आणि तो खाली पडला. शूटिंगदरम्यान अभिनेत्याला दुखापत झाली.नुकतंच, अक्षय कुमारने केवळ 'व्हिज्युअल इफेक्ट्स' (VFX) किंवा कृत्रिम तंत्रज्ञानावर अवलंबून राहण्यापेक्षा, प्रत्यक्ष स्टंट्स स्वतःच करण्याच्या आपल्या पसंतीबद्दल भाष्य केलं होतं. अक्षय म्हणालेला की, VFX किंवा AI यांचा अतिवापर केल्यास ॲक्शन सीनचा खरेपणा आणि त्यातील थरार कमी होऊ शकतो. तसंच, प्रत्यक्ष स्टंट्समुळे प्रेक्षकांना त्या सादरीकरणामागे घेतलेले कष्ट खऱ्या अर्थाने अनुभवता येतात, असंही त्यानं नमूद केलं.अक्षय व्यतिरिक्त, या चित्रपटात परेश रावल, असरानी, राजपाल यादव, तब्बू आणि वामिका गब्बी हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. 'भूत बंगला' चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख नुकतीच पुढे ढकलण्यात आली आहे. सुरुवातीला हा चित्रपट १० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार होता, परंतु आता हा सिनेमा १६ एप्रिल रोजी प्रदर्शित होईल.इन्स्टाग्रामवर सिनेमाबद्दल माहिती देत एकता कपूरनं लिहिलं की, 'आमचे डिस्ट्रिब्युटर्स आणि चित्रपटगृह मालकांशी एकत्रित चर्चा केल्यानंतर, आम्ही 'भूत बंगला'च्या प्रदर्शनासाठी १६ एप्रिल ही नवीन तारीख निश्चित केली आहे. या दिवशी रात्री ९ वाजता चित्रपटाचा पहिला शो सुरू होईल. 'धुरंधर: द रिव्हेंज' हा चित्रपट अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत असल्याची बातमी खूप चांगली आहे. या बदलामुळे दोन्ही चित्रपटांना प्रसिद्धी मिळवता येईल.'भूत बंगला' हा चित्रपट 'बालाजी मोशन पिक्चर्स' आणि 'केप ऑफ गुड फिल्म्स' यांच्या संयुक्त विद्यमानं सादर करण्यात आला असून चित्रपटाची निर्मिती अक्षय कुमार, शोभा कपूर आणि एकता कपूर यांनी केली आहे. तसंच सिनेमाचं दिग्दर्शन प्रियदर्शन यांनी केलं आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सेवानिवृत्ती शेवट नसून एका नवीन पर्वाची सुरुवात- एस.डि.ओ रविंद्र जोगी...





जनसंचलन/मेहकर

तहसील मध्ये महसूल सहाय्यक म्हणून कार्यरत श्रीकांत पुंडलिक लहाने यांच्या सेवापूर्ती समारंभा मध्ये सेवानिवृत्ती शेवट नसून एका नवीन पर्वाची सुरुवात आहे,असे मत उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी यांनी व्यक्त केले.

डोणगांव शासकीय गोदाम अंतर्गत येणाऱ्या सरकारी स्वस्त धान्य दुकानदार यांच्या वतीने दि ७ एप्रिल रोजी राजुरकर मंगल कार्यालय मध्ये आयोजित सेवापुर्ती समारंभाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपजिल्हाधिकारी अकोला संजय गरकल, निरिक्षण अधिकारी मेहकर नहुषकुमार बोरोडे तर प्रमुख अतिथी म्हणून नायब तहसीलदार अजय पिंपरकर,विवेक नालट, सुरेन्द्र कावळे, नितीन बोरकर,मंडळ अधिकारी पंजाबराव मेंटागळे आदि मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम दिपप्रज्वलन करून आयोजकांनी मान्यवरांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.प्रास्ताविक मनोगतातून डि आर वानखेडे यांनी या कार्यक्रम आयोजना मागील भूमिका स्पष्ट करुन मान्यवरांचे स्वागत केले.

या प्रसंगी महसूल सहाय्यक श्रीकांत लहाने यांच्या मातोश्री गं भा कांताबाई पुंडलिक लहाने,पत्नी सौ लक्ष्मी श्रीकांत लहाने सह श्रीकांत लहाने यांचा कपडे, भेटवस्तू देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.या भावनिक सेवापुर्ती समारंभात अजय पिंपरकर, नहुषकुमार बोरोडे,संजय गरकल, रविंद्र जोगी साहेब यांनी आपल्या मनोगतातून सन्मान, सत्कार आपला नसुन आपण दिलेल्या प्रामाणिक सेवेचा, कर्तव्यदक्ष पणाचा असुन आपल्या सारख्या कर्तव्यदक्ष कर्मचारीची नेहमीच प्रशासनात काम करताना गरज भासते, सेवानिवृत्ती हा सेवेचा जरी एक भाग असला तरी एका नवीन पर्वाची सुरुवात आहे.नवे क्षितिज, नवीन पहाट आपल्या जीवनात आनंद घेऊन योवो,या सदिच्छा त्यांनी दिल्या.यावेळी सत्कारमूर्ती श्रीकांत लहाने यांनी सर्वाचे आभार मानले.

या सेवापूर्ती समारंभाचे सुत्रसंचलन हमीद मुल्लाजी तर आभार प्रदर्शन भगवान बाजड यांनी केले.यशस्वीतेसाठी गोदाम व्यवस्थापक मंगेश मेश्राम,गोविंद पातुरकर,भानुदास कहाळे, बाबुलाल मोरे, गजानन पांडव,सौ उषा बाजड,भागवत वानखेडे, विष्णुपंत पाखरे, विश्वनाथ पाखरे,वासुदेव खुळे, पांडुरंग ठोकळ,साहेबराव खरात,विजय इंगळे,शेख सलाम, दत्तात्रय आखरे,सागर सुर्यवंशी, प्रमोद दांदडे, पांडुरंग मेटांगळे, विश्वनाथ कष्टे,विजय कंकाळ, खंदारकर, साईनाथ हिवरकर, आत्माराम चवरे, भगवान अंभोरे,गोपाल चगदळे आदि सरकारी स्वस्त धान्य दुकानदारांनी अथक परिश्रम घेतले.

# शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत क्रीडा प्रबोधिनींसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु

जनसंचलन/ बुलढाणा

राज्यात गुणवंत खेळाडू घडविण्यासाठी शिवछत्रपती क्रीडापीठ, पुणे अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनी केंद्रांमध्ये सन २०२६-२७ या वर्षासाठी १९ वर्षांखालील खेळाडूंच्या निवडीची प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. सरळ प्रवेश तसेच खेळनिहाय कौशल्य चाचणीद्वारे निवासी प्रवेश दिला जाणार आहे. राज्यातील अमरावती, नागपूर, अकोला, गडचिरोली, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद आणि पुणे येथे क्रीडा प्रबोधिनी केंद्रे कार्यरत असून, नव्या प्रशिक्षणार्थींची निवड प्रस्तावित आहे. या प्रबोधिनींमध्ये आर्चरी, ज्युदो, हॅण्डबॉल, ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, बॅडमिंटन, शूटिंग, कुस्ती, हॉकी, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, जिम्नॅस्टिक्स, जलतरण, फुटबॉल, ट्रायथलॉन व सायकलिंग अशा एकूण १६ क्रीडा प्रकारांमध्ये प्रशिक्षण दिले जाते. क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळ राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू तसेच राष्ट्रीय स्तरावरील सहभागी खेळाडूंची तज्ज्ञ समितीद्वारे चाचणी घेऊन पात्र खेळाडूंची निवड केली जाणार आहे. वैद्यकीय चाचणीमध्ये निवड झालेल्या शारीरिक दृष्ट्या सुदृढ खेळाडूंची निवड करण्यात येईल. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी अर्जदार हा १९ वर्षांखालील तसेच महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असणे अनिवार्य आहे. क्रीडा प्रबोधिनी प्रवेशासाठी खेळाडूकडे राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी स्पर्धेतील प्रमाणपत्रे, आधारकार्ड तसेच नगरपालिका / ग्रामपंचायत यांनी दिलेले जन्म प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. पात्र खेळाडूंनी राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी स्पर्धेतील प्रमाणपत्रे, आधारकार्ड तसेच नगरपालिका/ ग्रामपंचायत यांनी दिलेले जन्म प्रमाणपत्र जोडून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे दि.२४ एप्रिल २०२६ पुर्वी सादर करावे. सदर अर्जात खेळाडूचा संपर्क क्रमांक, पुर्ण पत्ता, ई-मेल आयडी नमुद करावा. विभागस्तरावर चाचण्यांचे आयोजन दि. २७ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत विभाग स्तरावर होणार आहे. तरी बुलडाणा जिल्ह्यातील पात्र संबंधीत खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडानगरी, जांभरुन रोड, बुलडाणा येथुन अर्ज प्राप्त करुन आवश्यक कागदपत्रासह दि.२४ एप्रिल २०२६ पर्यंत सादर करावे. तसेच अधिक माहितीकरीता जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.

# देवदर्शनासाठी गेलेल्या भाविकांच्या गाडीला उत्तर प्रदेशातील गाजीपुर नंदगज येथे अपघात...

## केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्य आणि जिल्हा प्रशासनाशी साधला संपर्क...

जनसंचलन/बुलढाणा

काशिविश्वनाथ दर्शनासाठी नेपाळकडे जाणाऱ्या महाराष्ट्रातील यात्रेकरुंच्या बसला वाराणसी-गोरखपुर महामार्गावरील गाजीपुर जवळ अपघात होऊन या अपघातात दोन महिलांचा घटनास्थळीच मृत्यु झाला आहे. यातील एक महिला बुलढाणा जिल्हयातील तर दुसरी महिला अकोला जिल्हयातील रहिवाशी आहे. तर अपघातात ३८ भाविक जखमी झाले आहे. जखमींना वैद्यकिय महाविद्यालयात उपचारास्तव दाखल केले असुन अपघाताची माहिती मिळताच केंद्रिय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधुन जखमींना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देशित केले. जय श्रीराम टुर्स ॲंड ट्रॅव्हल्स कंपनीच्या वतीने आयोजीत देवदर्शन पर्यटन यात्रे निमीत्त महाराष्ट्रातील ३८ भाविक अयोध्या व इतर तिर्थक्षेत्र दर्शनाकरीता निघाले होते. आज ९ एप्रिल रोजी यात्रेकरुं भाविकांची बस वाराणसी-गोरखपुर या महामार्गाने मार्गक्रम करत असतांनाच सकाळी ११.३० च्या सुमारास उत्तर प्रदेशातील गाजीपुर जवळील नंदगज येथे या बसला अपघात घडला.



या अपघातामध्ये २ महिलांचा मृत्यू झाला यामध्ये अकोला येथील ५० वर्षीय अन्नपुर्णाबाई तर बुलढाणा जिल्हयातील मोताळा तालुक्यातील रोहिणखेड येथील सरस्वतीबाई पाखरे यांचा समावेश आहे. उर्वरीत ३५ यात्रेकरु या अपघातात जखमी झाले आहेत. जखमींना वैद्यकिय महाविद्यालयात उपचारास्तव दाखल केले आहे. यातील तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. तर उर्वरीत ३२ यात्रेकरु किरकोळ जखमी आहेत. अपघातीची माहिती मिळताच केंद्रिय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी उत्तर प्रदेश राज्य सरकारडे संपर्क साधला व अपघातातील जखमींना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश दिले. केंद्रिय मंत्र्यांनी एवढयावरच न थांबता तेथील जिल्हाधिकारी दिनेश कुमार, सिएमओ डॉ.सुनिल पांडे यांच्याशी दुरध्वनीवरुन संपर्क साधुन जखमींना तात्काळ मदत करण्याचे सुचना दिल्या.

तर केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांचे सहाय्यक खाजगी सचिव डॉ.गोपाल डिके, आचल भाटीया हे घटनास्थळी हे मदतीसाठी गाजीपुर कडे रवाना झाले आहेत. तर दिल्ली येथील मंत्रालयातुनही संबधितांना निर्देशित करुन अपघातग्रस्तांना मदत करण्याचे काम केल्या जात आहे.

# पंतप्रधान मोदींच्या विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी तरुणांचे योगदान अनिवार्य आ. सौ. श्वेता महाले पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**

संसदीय लोकशाही अधिक सक्षम व प्रभावी बनविण्याच्या उद्देशाने राष्ट्रकुल संसदीय मंडळ () भारत शाखेच्या भारत विभाग, झोन-७ तर्फे पणजी, गोवा येथे आयोजित प्रादेशिक परिषदेत चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. लोकसभा अध्यक्ष मा. श्री. ओम बिर्ला यांच्या शुभहस्ते या परिषदेचे उद्घाटन झाले असून १० एप्रिलपर्यंत ही परिषद चालणार आहे. महाराष्ट्र विधीमंडळातील मान्यवर आमदारांसमवेत आमदार सौ. श्वेता महाले पाटील या परिषदेत सहभागी झाल्या असून २०४७ मधील विकसित भारताच्या संकल्पनेवर, तसेच व्यापार, पर्यटन, शहरीकरण, पर्यावरण व जलपर्यटन क्षेत्रात महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा राज्यांनी भविष्यात काय दिशा अवलंबावी यावर सखोल विचारमंथन होत आहे. या परिषदेत आधुनिक भारताच्या विकासात तरुण नेत्यांची भूमिका या विषयावर झालेल्या चर्चेत आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी आपले विचार मांडताना स्वामी विवेकानंदांच्या दूरदृष्टीचा संदर्भ दिला. स्वामी विवेकानंदांना संपूर्ण भारतात उच्च गुणांचे केवळ १०० तरुण हवे होते आणि ते म्हणाले होते की, असे १०० तरुण मिळाले तर ते भारताचे भविष्यच बदलून टाकतील. हे विचार आज शंभर वर्षांनंतरही किती प्रासंगिक आहेत, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ या संकल्पातून स्पष्ट होते, असे त्यांनी अधोरेखित केले. स्वामी विवेकानंदांच्या जन्मदिनी साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधत पंतप्रधान मोदी वारंवार तरुणांना देशाची खरी शक्ती म्हणून संबोधतात. मोदींचे विकसित भारत हे स्वप्न म्हणजे विवेकानंदांच्या जागृत भारताचीच आधुनिक आवृत्ती आहे, दोन्हींच्या केंद्रस्थानी तरुणांची ऊर्जा, नैतिकता आणि राष्ट्रसेवेची तळमळ आहे, असे उद्गार आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी काढले. भारताची अंदाजे ६५% ते ७४% लोकसंख्या ४० वर्षांखालील असून सरासरी वय अवघे २९.२ वर्षे आहे. ही प्रचंड तरुण शक्ती देशाचा लोकसंख्याशास्त्रीय लाभांश ( ) ठरणार आहे, असे त्यांनी नमूद केले. २५ वर्षांखालील ६० कोटींहून अधिक तरुण हे भारताची सर्वात मोठी संपत्ती असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. पंतप्रधान मोदी यांनी याच विचारातून स्किल इंडिया, स्टार्टअप इंडिया, मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया आणि अटल इनोव्हेशन मिशन यासारख्या योजना सुरू केल्या, ज्यांचे मूळ विवेकानंदांच्या कर्मयोगी तरुणाच्या संकल्पनेत आहे. तरुणांच्या कौशल्य विकासावर भर देऊन त्यांना नोकरी शोधणारे नव्हे, तर नोकऱ्या निर्माण करणारे बनविण्याचे मोदींचे धोरण हे विवेकानंदांच्या आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नाशी थेट जोडलेले आहे, असे आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी सांगितले. परिषदेतील सर्वात महत्त्वपूर्ण चर्चेचा विषय ठरला तो म्हणजे भारतातील हुशार व प्रतिभावान तरुणांचे अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंगडम यांसारख्या विकसित राष्ट्रांकडे होणारे सातत्यपूर्ण स्थलांतर, अर्थात ब्रेन ड्रेन. , , सारख्या देशातील सर्वोत्तम संस्थांमध्ये शिक्षण घेतलेले लक्षावधी तरुण दरवर्षी परदेशात स्थायिक होत आहेत. या तरुणांच्या निर्मितीसाठी देशाने कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक केलेली असते, परंतु त्यांच्या प्रतिभेचा व कौशल्याचा लाभ भारताऐवजी परदेशी अर्थव्यवस्थांना मिळतो. हे चित्र बदलणे विकसित भारताच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्याचे आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी परिषदेत ठामपणे मांडले. या समस्येची मुळे भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींमध्ये आहेत. जगातील आघाडीच्या विद्यापीठांच्या तुलनेत भारतीय विद्यापीठांचा दर्जा, संशोधन सुविधा, आणि जागतिक मान्यता यांमध्ये अजूनही मोठी तफावत आहे. त्यामुळे उच्च महत्त्वाकांक्षा असलेला तरुण स्वाभाविकपणे प्रतिष्टीत परदेशी विद्यापीठाकडे  आकर्षित होतो, असे त्यांनी नमूद केले. ब्रेन ड्रेन थांबवायचे असेल तर भारतीय विद्यापीठांना जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्थांमध्ये रूपांतरित करण्याशिवाय पर्याय नाही, असे आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी स्पष्टपणे सांगितले. सध्या अमेरिकेच्या अनेक मोठया संस्थांमध्ये लक्षावधी भारतीय वंशाचे प्रतिभावान व्यक्ती कार्यरत आहेत. त्यांना प्रवासी भारतीय उपक्रमाद्वारे भारताशी जोडून ठेवणे आणि त्यांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा व गुंतवणुकीचा लाभ भारतीय विकासासाठी घेणे हे ब्रेन ड्रेनला ब्रेन गेनमध्ये बदलण्याचा सर्वात प्रभावी मार्ग असल्याचे आमदार सौ.महाले पाटील यांनी सांगितले. मोदींच्या विकसित भारत संकल्पाशी सुसंगत अशा विकसित महाराष्ट्र उभारण्याचे काम राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली




महायुती सरकार करत आहे, याकडे आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी परिषदेत लक्ष वेधले. लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना यांसारख्या जनकल्याणकारी योजनांद्वारे राज्य सरकार तरुण, महिला आणि शेतकरी या तिन्ही घटकांना सक्षम बनवत आहे. विवेकानंदांना अभिप्रेत असलेला सेवेतून समाज परिवर्तन हाच विचार फडणवीस सरकारच्या या योजनांमध्ये प्रतिबिंबित होतो, असे त्यांनी नमूद केले. उच्च शैक्षणिक पात्रता, सखोल ज्ञान, उच्च नैतिक चारित्र्य, प्रचंड ऊर्जा, स्वच्छ व पारदर्शक कार्यपद्धती, उत्कृष्ट संघटन कौशल्य आणि उच्च देशभक्ती या गुणांनी संपन्न तरुण नेते भारतीय राजकारणाबद्दलची समाजाची नकारात्मक धारणा बदलून विधायक आणि विकासाभिमुख राजकारणाची नवी दिशा निर्माण करू शकतात. तरुण वय, उच्च शिक्षण, अचूक नियोजन, उत्कृष्ट अंमलबजावणी, स्वच्छ प्रतिमा आणि सामान्य माणसाच्या कल्याणाशी भावनिक नाते जपणारा नेता हाच विकसित भारताचा खरा शिल्पकार ठरेल. स्वामी विवेकानंदांनी रोवलेल्या तरुण शक्तीच्या बीजाला पंतप्रधान मोदी यांनी विकसित भारत २०४७च्या रूपाने विशाल वटवृक्षाचे स्वप्न दाखवले आहे आणि त्या स्वप्नपूर्तीसाठी आजच्या तरुण पिढीने कटिबद्ध राहणे हेच या महान राष्ट्राचे भवितव्य आहे, असे त्यांनी परिषदेत प्रतिपादन केले. राष्ट्रकुल देशांमध्ये संसदीय लोकशाही बळकट करण्याच्या या महत्त्वपूर्ण प्रयत्नात सहभागी होण्याची संधी मिळणे ही अत्यंत आनंदाची व अभिमानाची बाब असल्याची भावना आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी व्यक्त केली..

# समृद्धी महामार्गावर ट्रकची लांबच लांब रांगचे दुर्लक्ष, अपघाताचा धोका वाढला...

**जनसंचलन/ बुलढाणा**

समृद्धी महामार्गावर वाहन थांबविणे हा गुन्हा असतानाही डोणगाव हद्दीत ट्रक वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र समोर आले आहे.... महामार्गावर उभ्या असलेल्या या वाहनांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रकाराकडे आरटीओ विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याच चित्र दिसून आला आहे . नियमांचे उल्लंघन करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. समृद्धी महामार्ग हा वेगवान वाहतुकीसाठी ओळखला जातो. मात्र, अशा प्रकारे वाहनांच्या रांगा लागल्याने



अचानक अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे संबंधित विभागाने तातडीने कारवाई करून वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८